पोलीस आयुक्तालय,
मिरा-भाईंदर,वसई-विरार
सेक्टर-५, शांतीगार्डन, मिरारोड(पूर्व),जि.ठाणे ४०११०७
Phone No.022-29451003,
Email ID- cpoffice.mbvv@mahapolice.gov.in

जा.क्र.पोआ/मि.भा.व.वि/आस्था-४/पो.अंमलदार/ता.सेवाजेष्ठता यादी/03 /२०२५. दि.14/०१/२०२५.

संदर्भ :-१. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.एसआरव्ही२०११/प्र.क्र.२८४/१२, दि.२१/१०/२०११

२. महाराष्ट्र शासन गृह विभाग निर्णय क्र. संकीर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ब, दि.२६/१०/२०१७.

३. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. पीएमएन-०३१४/प्र.क्र.६८/पोल-५ब,दि.१०/१२/२०१८.

४. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना,दि. २१/०६/२०२१.

५.मा. पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचेकडील पत्र क्र.पोमसं/६/१३६/सेवाजेष्ठता/ मिभावनि/२०२२, दि. २७/०१/२०२३.

**विषय :- पोलीस अंमलदारांची तात्पुरती सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत...**

.....ooooo......

मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडील पत्र क्र.पोमसं/६/१३६/सेवाजेष्ठता/ मिभावनि/२०२२, दि. २७/०१/२०२३ रोजीच्या पत्रात दिलेल्या निर्देशानूसार मिरा-भाईंदर, वसई- विरार आयुक्तालयाच्या आस्थापनेवर टाणे ग्रामीण व पालघर घटकातून वर्ग झालेल्या तसेच इतर घटकातुन आंतर जिल्हा बदलीवर हजर झालेल्या सहा.पो.उप निरी, पोलीस हवालदार, पोलीस नाईक व पोलीस शिपाई सवंर्गातील पोलीस अंमलदाराची सेवाजेष्ठता यादी दि.१३/१०/२०२३ रोजी प्रसिध्द केली होती.

आयुक्तालयात पालघर-ठाणे ग्रामीण वर्ग झाले असून मुंबई व इतर घटकातुन आंतर जिल्हाबदलीवर बदलून आलेले असल्याने पोलीस अंमलदार यांचे सेवाजेष्ठतेतील तफावत दुर करण्याच्या दृष्टीने मा.पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी दि.२७/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानूसार पोलीस अंमलदारांची सेवाजेष्ठता खालील प्रमाणे निश्चित करण्यात आली असून यासोबत प्रसिदध करण्यात येत आहे.

अ) मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय शासन निर्णय दि.१३/०९/२०१९ अन्वये नव्याने निर्माण झाल्याने प्रथम टाणे ग्रामीण व पालघर घटकातून वर्ग झालेल्या अंमलदारांची सेवाजेष्ठता भरती दिनांक प्रमाण मानून निश्चित करण्यात आलेली आहे.

ब) त्यानंतर इतर घटकातुन बदलून आलेल्या अंमलदारांची सेवाजेष्ठता शासन निर्णय दि.२६/१०/२०१७ मधील सेवाजेष्ठतेच्या निकषाप्रमाणे त्यांचे भरती दिनांक प्रमाणे मानून निश्चित करण्यात आलेली आहे.

सदरची सेवाजेष्ठता यादी ही भरती दिनांक प्रमाण मानून लावण्यात आलेली असून सध्याच्या पदात ३ वर्ष कालावधी पुर्ण झाल्यानंतरच संबंधित अंमलदार यांना पुढील पदोन्नती देय राहिल तसेच सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यसन १२,दिनांक ०१/०८/२०१९ सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६/ब,दि.०७/०५/२०२१ मधिल निकष व शासनाने वेळोवळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

प्रभारी अधिकारी यांनी सदर सेवाजेष्ठता यादी सर्व पोलीस अंमलदार यांच्या निदर्शनास आणून दयावी. ज्या पोलीस अंमलदार यांना सेवाजेष्ठतेबाबत काही आक्षेप असल्यास ०७ दिवसात प्रभारी अधिकारी यांनी सर्व अंमलदार यांचे लेखी आक्षेप घेवून एकत्रितपणे दि.२१/०१/२०२५ पर्यंत इकडील कार्यालयास सादर करावे.पोलीस अंमलदार यांनी परस्पर सादर केलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.प्राप्त आक्षेपांची पडताळणी करुन संवर्गनिहाय अंतिम सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करण्यांत येईल.

(दत्तात्रय शिंदे)
अपर पोलीस आयुक्त
मिरा-भाईंदर,वसई-विरार

Scanned with CamScanner

प्रति

सर्व पोस्टे/शाखा प्रभारी अधिकारी.

प्रत :-

पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)मि.भा.व.वि./सहायक पोलीस आयुक्त (मुख्या),मि.भा.व.वि.

प्रत :- प्रभारी अधिकारी, सायबर गुन्हे, मि.भा.व.वि.

२/- सदरचे पत्र व सोबत सहा. पो उप निरी., पो.हवा., पोना व पो.शि. यांची तात्पुरती सेवाजेष्ठता यादी पीडीएफ फाईल मध्ये पाठविण्यात आली असुन सदर तात्पुरत्या सेवाजेष्ठता याद्या दि.१४/०१/२०२५ पर्यंत मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाच्या **mbvv.mahapolice.gov.in** हया बेवसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी.

Scanned with CamScanner